# दिवाणी न्यायाधीश (क. स्तर ) व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग–१, सावंतवाडी यांचे न्यायालयात

## (पिठासीन अधिकारी– श्रीमती जे. एम. मिस्त्री )

**दिवाणी किरकोळ अर्ज नं.६८/२०२५** **नि. ०१ खालील आदेश**

१. श्री. महादेव शांताराम गोवेकर,
वय सु. ८६ वर्षे, धंदा– सेवानिवृत्त,
रा. फ्लॅट नं. २, सुर्योदय बिल्डींग, रोड नं.६,
पांडुरंगवाडी, गोरेगांव पूर्व,
मुंबई –४०००६३.

२. श्री. सतिश रघुवीर गोवेकर,
वय सु. ५९ वर्षे, धंदा– नोकरी.
रा. फ्लॅट नं. ६०३/६०४, एसआरएस
ईस्ट वुड्स, दन आय बी एम कोंढवा खुर्द,
उंदरी रोड, क्लोअर प्लाझा समोर,
पुर्ण शहर, पुणे– ४११०४८.

३. श्री. संजय रघुवीर गोवेकर,
वय सु. ५६ वर्षे, धंदा– नोकरी
रा. उरणकर बोळ, १९८९, सी वॉर्ड,
सोमवार पेठ, कोल्हापूर.
४१६००२.

४. श्रीमती लक्ष्मी केशव गोवेकर,
वय सु. ८५ वर्षे, धंदा– गृहिणी.

५. श्री. महेश केशव गोवेकर,
वय सु. ५६ वर्षे, धंदा– नोकरी.
अर्जदार क्र. ४ व ५ दोन्ही
रा. १०४, पंचायत समितीजवळ,
सालईवाडा, सावंतवाडी,
ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग.

**– अर्जदार**

विरुध्द

कोणी नाही **–<u>सामनेवाला.</u>**

---

**अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ मधील तरतुदीनुसार वारस दाखला (Heirship Certificate) मिळण्यासाठी**.

---

अर्जदारतर्फे विधिज्ञ – श्री. एस. एस. सुकी.

---

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ मधील तरतुदीनुसार वारस दाखला (Heirship Certificate) मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**<u>अर्जातील कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे–</u>**

२. अर्जदार हे मौजे सालईवाडा, सावंतवाडी येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार क्र. १ यांची सख्खी बहिण, तीच अर्जदार क्र. २, ३ व ५ यांची आत्या

व अर्जदार क्र. ४ ची नणंद कुसुम शांताराम गोवेकर ही दिनांक ८/६/१९७४ रोजी मुंबई येथे मयत झाली. ती अविवाहित होती. अर्जदार यांच्या मौजे सावंतवाडी येथे मिळकती असून मिळकतीच्या हस्तांतरण संदर्भात त्यांना ते मयत कुसुम शांताराम गोवेकर हिचे कायदेशीर वारस आहेत असा दाखला आणावा असे महसुली अधिकारी यांनी तोंडी कळविले. त्यामुळे अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

३. प्रस्तुत अर्ज दाखल झाल्यानंतर सदर अर्जाची नोटीस सावंतवाडी न्यायालयाच्या नोटीस बोर्डावर, तहसीलदार कार्यालय, सावंतवाडी यांचे नोटीस बोर्डवर, नगरपंचायत कार्यालय सावंतवाडी कार्यालयाचे नोटीस बोर्डवर, सावंतवाडी येथे सार्वजनिक ठिकाणी व दैनिक 'सकाळ' सिंधुदुर्ग आवृत्ती येथे प्रसिध्द करुन अर्जातील मागणीबाबत हरकती मागविल्या. परंतु सदर अर्जास कोणीही हरकत घेतली नाही.

४. माझे समोर अर्ज निर्णित करण्यास खालील मुद्दे विचारधीन झाले आहेत. त्यांचा निष्कर्ष मी त्याखाली नमुद करणमिमांसेसहित नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| ०१. | अर्जदार क्र. १ ते ५ मयत कुसुम शांताराम गोवेकर हिचे कायदेशीर वारस आहेत हे अर्जदार शाबीत करतात काय ? | | होकारार्थी |
| ०२. | अर्जदार मागणीप्रमाणे वारस दाखला मिळणेस पात्र आहेत काय ? | | होकारार्थी |
| ०३. | आदेश काय ? | | अंतिम आदेशाप्रमाणे |

## :– का र ण मि मां सा –:

**मुद्दा क्र. १ ते ३ करीता–**

५. अर्जाच्या पुष्टयर्थ अर्जदार क्र. ५ श्री. महेश केशव गोवेकर यांनी नि. १० कडे आपले सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. तोंडी पुराव्याव्यतिरिक्त अर्जदार यांनी त्यांची आत्या कुसुम शांताराम गोवेकर हिचे मृत्युप्रमाणपत्राची प्रत नि. ११ कडे, अर्जदार यांचे काका रघुविर शांताराम गोवेकर यांचे मृत्युप्रमाणपत्राची प्रत नि. १२ कडे, अर्जदार यांची काकी सुशिला रघुविर गोवेकर यांचे मृत्युप्रमाणपत्राची प्रत नि. १३ कडे, अर्जदार यांचे वडील केशव शांताराम गोवेकर यांचे मृत्युप्रमाणपत्राची प्रत नि. १४ कडे, अर्जदार क्र. १ ते ५ यांचे आधारकार्डची प्रत नि. १५ ते १९ कडे व सावंतवाडी सिटी सर्वे नंबर ५७०२ चा प्रॉपर्टी कार्डचा उतारा नि. २३/१ कडे इत्यादी कागदपत्र दाखल केले आहेत. नि. २१ कडे पुरशिस दाखल करुन अर्जदार यांनी आपला पुरावा बंद केला आहे.

६. मयत कुसुम शांताराम गोवेकर या अर्जदार क्र. १ ची सख्खी बहिण, अर्जदार क्र. २, ३ व ५ ची आत्या व अर्जदार क्र. ४ ची नणंद आहे. मयत कुसुम शांताराम गोवेकर ही अविवाहित होती. अर्जदार यांच्या व्यतिरिक्त तिला जवळचे वारस नाहीत. प्रस्तुत अर्ज अर्जदार यांची नांवे मयताच्या मिळकतीला महसुल दप्तरी नोंद करण्याकरीता दाखल करण्यात आला आहे. अर्जदारांच्या अर्जास कोणीही हरकत घेतलेली नाही. अशा परिस्थितीत अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत कुसुम शांताराम गोवेकर यांचे कायदेशीर वारस आहेत व त्यांना वारस प्रमाणपत्र देणे योग्य व न्यायोचित होईल. करीता मी मुद्दा क्र. १ व २ चे निष्कर्ष 'होकारार्थी ' नोंदवून मुद्दा क्र. ३ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १ –श्री. महादेव शांताराम गोवेकर, २–श्री. सतिश रघुविर गोवेकर, ३– श्री. संजय रघुविर गोवेकर, ४–श्रीमती लक्ष्मी केशव गोवेकर व ५–श्री. महेश केशव गोवेकर हे मयत कुसुम शांताराम गोवेकर यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) योग्य त्या कोर्ट फि स्टँम्पवर देण्यात यावे.

JAHEDA MOHMED MISTRY
Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2026.05.05 17:02:16 +0530

दिनांकः– ०५/०५/२०२६

(जे. एम. मिस्त्री)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
सावंतवाडी.